आदिवासी विकास सेवा संवर्गात उच्च पदावर पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करणे व निवडसूचीचे पुनर्विलोकन करण्यासाठी समित्या स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय, क्र. आस्था-१०९२/प्र.क्र. १५/का-१५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ४ ऑक्टोबर, १९९४.

वाचा :-१] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०८६/८७८/प्र.क्र. ३३०/का-१५, दिनांक १०.११.८६.
२] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०८९/प्र.क्र. ७९९/का-१५, दिनांक १५.२.९१.
३] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०९२/प्र.क्र. १५/का-१५, दिनांक १७.२.९३.
४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-१०९२/प्र.क्र. ६/१८[र.व का.] दिनांक १०.२.९२.
५] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०९२/प्र.क्र. १५/का-१५, दिनांक ४ जून, १९९३.
६] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०९२/प्र.क्र. २२२/का-१५, दिनांक १९.१.९३.
७] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आस्था-१०९३/प्र.क्र. २०२/९३/का-१५, दिनांक ९.११.९३.

शासन निर्णय:-प्रस्तावनेतील अनुक्रमांक ३ व ५ च्या आदेशान्वये आदिवासी विकास सेवेतील वर्ग-३ च्या पदावरील [राज्यस्तरीय पदे] पदोन्नतीसाठी निवडसूची व तिचे पुनर्विलोकन करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. दि. १९.१.९३ च्या आदेशाअन्वये आदिवासी विकास सेवा वर्ग-३ हा संवर्ग प्रादेशिक संवर्ग म्हणून घोषित करण्यात आला आहे. तसेच प्रस्तावनेतील अनुक्रमांक ७ येथील आदेशाअन्वये राज्यातील ११ एकात्मिक प्रकल्प कार्यालयाचे बळकटीकरण करण्यात आले असून त्यानुसार भारतीय प्रशासनिक सेवा/भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांची प्रकल्प अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे यापूर्वी गठीत करण्यात आलेल्या समित्यांची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.
प्रस्तावनेतील अ.क्र.३ मधील शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य स्तरीय पदे वगळता उर्वरित वर्ग-३ पदावरील पदोन्नतीसाठी निवडसूची व तिचे पुनर्विलोकन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या [ड] येथे दर्शविण्यात

जिल्हाधिकारी कार्यालय

आलेल्या समितीची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १] | अपर आयुक्त, आदिवासी विकास | अध्यक्ष |
| २] | अपर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील ज्येष्ठतम भारतीय प्रशासकीय सेवा किंवा भारतीय वन सेवेतील प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ३] | अपर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील ज्येष्ठतम विभागीय प्रकल्प अधिकारी | सदस्य |
| ४] | अपर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रातील किंवा त्यांच्या कार्यालयातील ज्येष्ठतम मागासवर्गीय वर्ग-१ मधील अधिकारी. | सदस्य |
| ५] | अपर आयुक्त कार्यालयातील उपआयुक्त | सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ श्री. वि. जाधव ]
कार्यासन अधिकारी

प्रति,

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/अमरावती/ठाणे.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी
सर्व जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, जुने जकात घर,
डी-डी, इमारत, फोर्ट, मुंबई.
महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल, [लेखापरीक्षा], महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
निबंधक सहकारी संस्था, आदिवासी विकास, नाशिक.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, का-१५, आदिवासी विकास विभाग.